प्रसिद्धी : अग्रोवन पण ७, कथा काळया आईची ०३ जानेवारी २०१०

# कथा काळया आईची

श्रीनिवास हेमाडे

शेतकरी शेतजमिनीला 'काळी आई' म्हणतो. 'आई' या संज्ञेची खरे तर अधिक स्पष्टीकरण देण्याची अथवा त्या संज्ञेची व्याख्या करण्याचीही आवश्यकता नाही, इतकी ती नैसर्गिक घटना आहे. माणसाची कथा आणि व्यथा मातृत्वाशीच जोडली गेली आहे.हे मातृत्व मानवी मातेचे आणि काळ्या आईचे दोघांचे आहे.

'मानव' ही परमेश्वराची सर्वोच्च निर्मिती असल्याचे मानण्यात येते.परमेश्वर सर्वश्रेष्ठ,सर्व शक्तिमान मानला गेला असला तरी तो मातृसुखापासून वंचित असल्याने 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' अशा शब्दात परमेश्वराच्या जीवनातील त्रुटीही आपण दाखवितो.लोककल्याणासाठी परमेश्वर अवतार घेतो, असा समज असला तरी मूलपण अनुभवण्यासाठीही तो मानवी आईच्या पोटी जन्म घेतो, अवतार घेतो असाही लोकसमज आहे.अर्थात तो किती खरा किंवा खोटा, हा आपला विषय नाही.

मातेचे महत्व आणि उपयुक्तता समजल्यानंतर जगात सर्वत्र प्रथम मातृसत्ताक कुटुंबपध्दतीच अस्तित्वात आली.हूकुमशाही, लष्करशाही अथवा लोकशाही इत्यादी कोणतीही राज्यसंस्था अथवा प्रशासन व्यवस्था निर्माण होण्यापूर्वीच पृथ्वीवरील मानवी समूह प्राचीन काळी आईची सत्ता मानणारा मातृवंशीय समाज म्हणून विकसित झाला.आईच्याच आज्ञेनुसार जगण्याची रचना केली जात होती. आजही भारतात केरळसारख्या काही ठिकाणी मातृवंशीय कुटुंबव्यवस्था आहे.

पण जसा जसा संस्कृतिचा विकास झाला तसे भूमि आणि स्त्री यांना समांतर मानले गेले. किंबहुना समांतरतेचा हा विचार माणसाच्या मनात इतका रूजला की मानवी संस्कृतीची रचनाच त्या विचारावरच झाली. परिणामी भूमि आणि स्त्री या दोघांवर हक्क गाजविण्यापासून 'खासगी मालमत्ता ' ही संकल्पना उदयास आली. माणसाच्या विकासक्रमात हे कधी घडले हे निश्चित सांगता येणे कठिण आहे.पण त्या घटनेपासून शेतीविकास आणि मानवी समाजाचा विकास यांची कहाणी सुरू होते.

'खासगी मालमत्ता' निर्माण होणे हा पुरुषप्रधान संस्कृतीचा पाया बनला.या संस्कृतीमुळे भटका माणूस जमिनीवर स्थिरावला खरा; पण याच संस्कृतीने अमाप दुःख निर्माण केले.अर्थात मानवी जीवनात दुःख अनिवार्य, अटळ आहे हे खरेच आहे.पण दुःख फक्त पुरुषालाच असते,असा समज कवटाळून आजपर्यंतचे माणसाचे जगणे झाले. स्त्रीलाही दुःख असते,हे विसरले जाते. विशेषतः स्त्रियांमध्येही 'आई' चे दुःख अधिक उग्र, तीव्र असू शकते, हे मुलांना एकतर कळत नाही किंवा इतक्या उशीरा कळते की आईचा अंतःकाळ जवळ आलेला असू शकतो.

तसेच काहीसे आपल्या काळ्या आईबाबत घडत आहे.या काळ्या आईलाही दुःख आहे.पण ती बोलू शकत नाही.ती मूक,अबोल आहे.हवा,पाणी,अन्न,वस्त्र, निवारा ती सगळ्यांना देवू शकते.पण तिच्याकडून या मूलभूत गरजांची खूपच लूटालूट सुरु झाली आहे.तिला केवळ ओरबाडण्याचे अनैतिक काम मुले करीत आहेत.''आपली मुले आपल्याशीच वाईट वागत आहेत, एवढेच नव्हे तर पुढच्या पिढीशीही वाईट वागत आहेत, त्याही पुढे जावून ते स्वतःशीही वाईट वागत आहेत '' हेच काळ्या आईचे अंतरीचे दुःख आहे.तिच्या दुःखाची ही कथा आहे.

पण कोणत्याही आईची सगळीच मुले दुष्ट स्वार्थी,बुध्दिची नसतात, काही मुले चांगली असतात.अशाच काही चांगल्या मुलांनी काळ्या आईचे आरोग्य कसे टिकेल,संवर्धन होईल,तिच्या सर्व मुलांना मूलभूत गरजा कशा मिळतील याचा विचार केला आहे.वाईट भावांना वाईटपणापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करणारे ही काही मुले आहेत 'आई जिवंत राहिली तर मुले जिवंत राहतील' या गोष्टीची ते काळजी घेत आहेत.त्यामुळे ही जशी काळ्या आईच्या दुःखाची कथा आहे तशी ही 'काळ्या आईशी चांगले कसे वागावे आणि का वागले पाहिजे', याचीही कथा आहे.काही सुजाण मुलांनी काळ्या आईसंबंधी कसा,कोणता विचार केला, याची कथा या लेखमालेत मांडण्यात येईल.

---